00232

दिनांक – २८/८/२०२३

प्रती,

मा. लोकनेते निलेशजी लंके साहेब,

आमदार ,पारनेर नगर मतदार संघ .

**विषय – मौजे डिकसळ येथे विविध विकासकामांच्या मागणीबाबत ..**

मा. आमदार साहेब आमचे डिकसळ हे गाव मागील कित्येक वर्षांपासून विविध विकासकामांच्या प्रतीक्षेत आहे.आपण आमदार झाल्यापासून सर्व ग्रामस्थ आपणाकडून खूप काही विकासकामांच्या अपेक्षा ठेवून आहेत.त्या अपेक्षा पूर्ण करण्यात आपण कोणतीही कसर ठेवणार नाहीत याची देखील आम्हाला पूर्ण खात्री आहे.यापूर्वी देखील आपण विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहेच. मागील काही दिवस सत्तेत नसल्यामुळे आम्ही आपणाकडे विकास कामांचा पाठपुरावा केला नाही परंतु आता आपण सत्तेत सहभागी असल्यामुळे आमच्या आपणाकडून खूप अपेक्षा आहेत. गावातील विविध विकासकामांचा अनुशेष भरून काढण्यासाठी काही महत्वाच्या व गरजेच्या कामांची यादी खाली देत आहोत .तरी आपण सदर कामांसाठी कोणत्याही योजनेतून किंवा आपल्या आमदार निधीमधून निधी उपलब्ध करून द्यावा..व कामे मार्गी लावावीतहि विनंती ..

(A) १. **डिकसळ चौफुला (पारनेर –गोरेगाव रोड ) ते डिकसळ माथा (पारनेर –भाळवणी रोड ) ३ कि.मी.रस्ता डांबरी करण करणे.** 3/cm

**अंदाजे रक्कम (१ कोटी रुपये )**

सदर रस्ता हा गोरेगाव –डिकसळ-लोणी हवेली –हंगा - शहजापूर या गावांना जोडणारा रस्ता असून सदर रस्ता एम डी आर झालेला असून शहजापूर –हंगा –लोणी –डिकसळ माथा इथपर्यंत पूर्ण झालेला आहे केवळ हा ३ कि.मी चा भाग बाकी आहे .आणि गावातील खूप मोठी लोकवस्ती या रस्त्याच्या दोन्ही बाजूला वसलेली आहे.आणि पावसाळ्या च्या दिवसात या रस्त्याने जाताना लोकांचे खूप हाल होतात .गाडी घेऊन जाता येत नाही ..तेव्हा या रस्त्याचा प्राधान्याने विचार करावा..

(B) **२.डिकसळ शिंदे वस्ती (करंदी रोड ) ते डिकसळ –करंदी शिव १ किमी .रस्ता डांबरी करण करणे.**

**अंदाजे रक्कम (३० लक्ष रुपये )**

सदर रस्ता हा डिकसळ ते करंदी असा रस्ता असून या रस्त्या अंतर्गत गावातील खूप मोठी लोकसंख्या असलेली चौधरी वस्ती (टाकळ विहीर),परांडे वस्ती ,शिंदे वस्ती ,सूर्यवंशी वस्ती असून या रस्त्यानेच सर्वांना ये जा करावी लागते .या रस्त्याचा ६०० मी. चा भाग यापूर्वी जि.प.च्या निधीतून झालेला आहे .परंतु पुढे आणखी १ कि.मी.पर्यंत लोकवस्ती मोठी आहे .आणि पावसाच्या दिवसात लोकांना कोणतेही वाहन घेऊन जाताना खूप त्रास घेऊन जावे लागते .तेव्हा हा रस्ता आपण मंजूर करून दिला तर त्याचा खूप फायदा होणार आहे .

P.T.O

**३.डिकसळ माथा ते वाबळे वस्ती रस्ता खडीकरण /डांबरीकरण करणे . अंदाजे रक्कम ( ५० लक्ष रुपये )**

डिकसळ माथा ते वाबळे वस्ती रस्ता हा डिकसळ –जामगाव शिव रस्ता असून सदर रस्ता हा गावातील सर्व लोकांसाठी वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा असून सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रोजगार हमी योजनेमधून झालेला असून सदर रस्त्याचे खडीकरण किंवा डांबरी करण होणे खूप आवश्यक आहे कारण पावसाळ्याच्या दिवसामध्ये सदर रस्त्यावर खूप चिखल होतो आणि त्यामुळे सदर रस्त्यावरून वाहतूक करणे फार अवघड जाते ..म्हणून या कामासाठी निधी उपलब्ध झाल्यास खूप लोकांचा मोठा प्रश्न मार्गी लागणार आहे.

**४.गावातील तलावाजवळ दशक्रिया विधी च्या जागेच्या ठिकाणी सिमेंट कॉन्क्रीटीकरण करणे. अंदाजे रक्कम (१० लक्ष रुपये )**

MCA

गावातील तलावाजवळ दशक्रिया विधी पार पडले जातात .परंतु त्या ठिकाणी बसण्याची जागा व्यवस्थित नसल्यामुळे आलेला जनसमुदाय एका ठिकाणी न बसता इकडे तिकडे बसलेला पाहायला मिळतो .त्याठिकाणी जर त्या जागे मध्ये सिमेंट कॉन्क्रीटीकरण कामासाठी १० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून दिला तर त्या ठिकाणी सदर जागा बसण्यासाठी योग्य व सुशोभित होईल..

**५.डिकसळ गावठाण ते शिंदे वस्ती (खळवाडी ) रस्ता अंतर्गत सी डी वर्क मंजूर करणे..अंदाजे रक्कम (५०लक्ष रुपये )**

MCA

गावातील शिंदे वस्ती (खळवाडी) हि मोठी लोकवस्ती असलेली वस्ती असून सदर वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यामध्ये ओढा असल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात व जोपर्यंत सदर ओढ्याला पाणी आहे तोपर्यंत सदर वस्तीमध्ये राहणाऱ्या लोकांना आपल्या वस्तीपर्यंत कोणतेच वाहन घेऊन जाता येत नाही तर वाहन हे गावातच ठेवावे लागते अशी परिस्थिती असते व कुठेतरी शेताच्या बांधावरून गावामध्ये यावे लागते अशी परिस्थिती आहे. जर त्याठिकाणी ओढ्यावर सी डी वर्क झाला तर सदर वस्तीमध्ये राहणाऱ्या लोकांचा खूप मोठा प्रश्न मार्गी लागेल.

**६. महादेव मंदिर ते स्मशान भूमी- डिकसळ जामगाव रस्ता पर्यंत रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे.अंदाजे रक्कम ( ५ लक्ष रुपये )**

MCA

गावातील स्मशानभूमी हि गावालगतच असून त्याठिकाणी जाण्यासाठी कॉन्क्रीट रस्ता होणे गरजेचे आहे.त्यामेले स्मशान भूमी सुशोभीकरण कामामध्ये आणखी भर पडणार आहे. म्हणून सदर रस्ता कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा .

वरील सर्व कामे हि खूप महत्वाची असल्यामुळे आपण आपल्या स्तरावर प्राधान्याने निधी उपलब्ध करून द्यावा व सदर कामे पूर्ण करून द्यावीत हि आपणास सर्व ग्रामस्थांच्या वतीने नम्र विनंती..आपण आमच्या सर्व मागण्या मान्य कराल व लवकरात लवकर पूर्ण कराल हीच अपेक्षा ठेवतो.

आपला विश्वासू

**श्री. शरद काकडे (मा. सरपंच ) व सर्व सहकारी**